मा. प्रशासक
पुणे महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय
पुणे महानगरपालिका
दिनांक:२०/०५/२०२५

**पुणे महानगरपालिका**
**स्थायी समिती**
**दाखल कार्यपत्रिका**

विषय क्र.१२०त्वर्य

रमाबाई आंबेडकर महिला सबलीकरण केंद्र, ३९/१८, गणेश नगर, ओटा वसाहत, एरंडवणे, पुणे -३८ यांना भाडेपट्टयाने देणेत आलेल्या प्रभाग क्र. १३ (पूर्वीचा प्रभाग क्र. ३५) मधील मनपा मालकीच्या सहकार उद्यानामधील वास्तूचा भाडेपटट्याचा कालावधी पाच वर्षा ऐवजी प्रथमतः दहा वर्षाकरीता वाढविणे व त्यानंतर सदरची मुदत आणखीन २० वर्षासाठी वाढविणे अशी एकुण ३० वर्षासाठी भाडे पट्टयाने देणे व राज्य शासनाच्या निश्चित केले प्रमाणे भाडे आकारणी करून करारनामा करणेकरीता मा. स्थायी समितीमार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सविवि/११७, दि.१९/०५/२०२५ चे पत्र.

विषय क्र.१२१त्वर्य

सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना १५ लाख लिटर प्रती दिवस विना प्रक्रिया ( raw water) पाणी देण्यासाठी खालील बाबींस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पापु/११८, दि.१९/०५/२०२५ चे पत्र.

1) सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना पुणे महानगरपालिकेच्या लष्कर जलकेंद्र येथून 1.50 एम.एल.डी. विना प्रक्रिया (raw water) पाणी पुरवणेस.
2) सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांना 1.50 एम.एल. डी. विनाप्रक्रिया (raw water) पाण्यासाठी रक्कम रुपये 27.46 प्रति किलो लिटर ($m^3$) या दराने बिल आकारणी करणेस. तसेच या दरामध्ये प्रतिवर्षी 10% वाढ करणेस.
3) पाटबंधारे विभागाने पाण्याच्या दरामध्ये वाढ केल्यास वाढीव दराने सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड पुणे यांना सदर वाढीनुसार पाण्याचे बिल आकारणेस.
4) सिरम इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्याशी 1.50 एम.एल.डी. विना प्रक्रिया (raw water) पाणीपुरवठा करण्यासाठी आवश्यक करारनामा करणेस.

विषय क्र.१२२त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या विविध क्षेत्रिय कार्यालये, आरोग्य केंद्रे (दवाखाने), जलकेंद्रे, सांस्कृतीक केंद्रे, क्रीडांगणे, स्मशानभुमी, मंडई, माध्यमिक विदयालये, कचरा हस्तांतरण केंद्र, मैलापाणी शुध्दीकरण केंद्र, उदयाने वस्तीगृह इत्यादी ठिकाणी 'बहुउददेशीय कामगार' पुरविणे या कामाचे मुदतवाढीसाठी खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/सुरक्षा/११९, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

१. दि.१/०४/२०२५ पासुन नविन वर्क ऑर्डर देईपर्यंत मे. इगल सिक्युरीटी सर्व्हिसेस प्रा.लि., मे. सैनिक इंटेलिजन्स ॲन्ड सिक्युरीटी प्रा.लि. व मे. सिंघ इंटेलिजन्स ॲण्ड सिक्युरीटी प्रा.लि. या संस्थेसमवेत करारनामा करुन काम करुन घेणेस.
२. मे. शासनाकडून किमान वेतन दर व विशेष भत्यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या वाढीसह संबंधीताना बिले आदा करणेस.
३. सदर कालावधीतील बिले सन २०२५-२६ मधील चालु आर्थिक वर्षातील अंदाजपत्रक अर्थशिर्षकामधुन बिले आदा करणेस.

| बजेट कोड | २०२५-२०२६ अर्थसंकल्पीय तरतुद |
|---|---|
| RE11D130 | 20000000.00 |
| RE26A118 | 130000000.00 |
| RE17F109A | 80000000.00 |
| RE17F147B | 150000000.00 |
| XE12A127 | 50000000.00 |
| RE28A134 | 40000000.00 |
| RE22D112 | 2000000.00 |
| RE29A111 | 2000000.00 |
| RE22A124 | 10000000.00 |
| एकुण | 700000000.00 |

विषय क्र.१२३त्वर्य

पुणे पेठ पाषाण स.नं.१ ते १३ या मिळकतीमधील ३० मी. डीपी रस्त्याने बाधित आरक्षित जागा पुणे मनपाच्या ताब्यात घेणेकामी सक्तीची भूसंपादन कार्यवाही सुरु करणेस मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१३९, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

१. पुणे पेठ पाषाण स.नं. १ ते १३ या मिळकतीमधील ३० मी. डी.पी. आरक्षित जागा पुणे मनपाच्या ताब्यात घेणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेल्या तक्त्यानुसार डी.पी. रस्त्याने बाधित क्षेत्रातील भूसंपादन कार्यवाही सुरु करणेस.

२. पुणे पेठ पाषाण स.नं. १ ते १३ या मिळकतीमधील ३० मी. डी.पी. आरक्षित जागा पुणे मनपाच्या ताब्यात घेणेकामी सक्तीची भूसंपादन कार्यवाही सुरु करणेस मनपाच्या सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पामध्ये पथ विभागाकडील भूसंपादन करणेकरिता आवश्यक रक्कम रुपये १५ कोटी एवढी आर्थिक तरतुद CE20A102/A2-2025 या अर्थशिर्षकावरुन उपलब्ध करुन मिळणेस.

३. पुणे पेठ पाषाण स.नं. १ ते १३ या मिळकतीमधील ३० मी. डी.पी. आरक्षित जागा पुणे मनपाच्या ताब्यात घेणेकामी सक्तीची भूसंपादन कार्यवाही करणेस.

विषय क्र.१२४त्वर्य

पुणे शहरात विविध ठिकाणांचे "हेरीटेज वॉक" सुरु करणेसाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५ (२) (२) अन्वये खालील बाबींस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/भवन/१२१, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

१) श्री. अजित वामन आपटे यांचे समवेत २ वर्षाकरिता हेरिटेज वॉक करणेस व त्यापोटी कॉन्टॅक्ट फी म्हणून त्यांना ६ ते १३ पर्यटकांच्या संख्येसाठी र.रू. ३१००/- प्रति वॉक व १३ ते १८ पर्यटक संख्येसाठी प्रमाणशीर र.रु.३१०० ते ४१००/- प्रती वॉक अदा करणेस.

२) श्री. अजित वामन आपटे यांचेसमवेत MOU करणेस.

३) हेरिटेज वॉकचे प्रसिध्दीसाठी माहितीपुस्तिका, ब्रोशर, पोस्टर इ. साठी कोटेशन पध्दतीने र.रू.२/- लक्ष पर्यंत खर्च करणेस.

४) हेरिटेज वॉककरिता प्रौढांसाठी र.रू. ३००/- व उच्च माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी र रु.२००, माध्यमिक विद्यार्थ्यांसाठी र.रू. १००/-, परदेशी पर्यटकांना र.रू.५००/- फी आकारणी करणेस.

विषय क्र.१२५त्वर्य

रामटेकडी औद्योगिक वसाहत हडपसर सर्वे नंबर ९४/२ फायनल प्लॉट नंबर ८८ येथे ७५० मे.टन. प्रतिदिन इतक्या क्षमतेसाठी उभारण्यात येणाऱ्या कचऱ्यापासून वीजनिर्मिती प्रकल्प कार्यान्वित झालेनंतर प्रगतीच्या अनुषंगाने अनुदान प्रदान करणे व प्रकल्प उभारणीच्या अनुषंगाने मुदतवाढ व इतर खर्चाबाबत खालील बाबींस मान्यता मिळणेसाठी मा. महा. आयुक्त यांचे जा.क्र.मआ/घनकचरा/१२२, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

१) प्रकल्प उभारणी फेज २ चे कामकाजाकरीता फायनल प्लॉट नं. १०४/२ मधील ५४,३७१.४८ चौ.मी पैकी पूर्वेच्या बाजूकडील ६ एकर जागा १ वर्ष कालावधी करीता पुणे मनपाच्या भाडे आणि सुरक्षा ठेव निर्धारण समितीमार्फत ठरविण्यात येणारी भाड्याची रक्कम व सुरक्षा अनामत ठेव मे. पुणे बायो एनर्जी सि. प्रा.लि. यांचेकडून घेऊन व करारनामा करून सदर जागा मे.पुणे बायो एनर्जी सि. प्रा.लि. यांना भाडेतत्वावर देणेस.

२) पुणे मनपाच्या शास्त्रोक्त भूभराव (SLF) मध्ये यापूर्वी झालेल्या निविदा क्र.६२/२०२३-२४ मधून र.रु.२८०/- प्रती मे.टन यानुसार हाताळणी खर्च व रिजेक्ट वाहतुकीसाठी निविदा क्र.३२/२०२४-२५ मधून र.रु.३५६/- प्रती मे.टन यानुसार एकत्रितपणे र.रु.६३६/- प्रती मे.टन या दराने मे.पुणे बायो एनर्जी सि. प्रा.लि. यांचेकडून दि.२२/०५/२०२१ ते दि.३१/०३/२०२५ या कालावधीत एकूण २५५८८.४०० मे.टन इतक्या रिजेक्टची वाहतूक करून विल्हेवाट लावण्यात आलेली असल्याने त्यानुसार प्रति मे.टन. र.रु.६३६/- या दराने सदर रिजेक्टची विल्हेवाट लावणे कामी झालेल्या खर्चाचा परतावा मे. पुणे बायो एनर्जी सिस्टिम्स प्रा.लि. यांना मनपाकडील अर्थशीर्षक RE19A179 रामटेकडी येथील ७५० मे.टनक्षमतेच्या वेस्ट टू एनर्जी कचरा प्रकल्पासाठी टिपिंग फी अदा करणे या अर्थशिर्षकावरील र.रु.६.५० कोटी या रक्कमेमधून अदा करणेस.

३) मे.पॉवर फायनान्स कॉर्पोरेशन यांचेकडून फायनान्शियल क्लोजरची प्रक्रिया पूर्ण होणेसाठी निर्धारित कालावधीपेक्षा अतिरिक्त कालावधी लागलेला असल्यामुळे मे. पुणे बायो एनर्जी सिस्टिम्स प्रा.लि. यांना प्रकल्प उभारणी फेज-२ करीता दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देणेस व त्यापुढील कालावधीकरीता प्रकल्प उभारणीचा आढावा घेऊन मुदतवाढी बाबत निर्णय घेणेस.

४) मे. पुणे बायो एनर्जी सिस्टिम्स प्रा.लि. यांना पुणे मनपाकडून मा.मुख्य सभा ठ.क्र.१००३, दि.२०/०२/२०१८ अन्वये देय र.रु.८९.९५/- कोटी या रकमेपैकी उर्वरित देय रक्कम रु.३६.१४ कोटी या रक्कमेची बँक गॅरंटी मे. पॉवर फायनान्स कार्पोरेशन यांना पुणे मनपाकडील अर्थशीर्षक CE19A190 हडपसर रामटेकडी येथील ७५० मे.टन क्षमतेच्या बेस्ट टू एनर्जी कचरा प्रकल्प येथे विविध कामे करणे या अर्थशिर्षकावरील र.रु.२२.०० कोटी या रक्कमेमधून देणेस व कमी पडणारी रक्कम वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून देणेस

५) Ministry of Power, केंद्र सरकार यांचेकडून ईलेक्ट्रिसिटी अ‍ॅक्ट २००३ मध्ये ईलेक्ट्रिसिटी अ‍ॅक्ट २०२० असा बदल करण्यात आला असल्याने व त्यामुळे Net Metering चे ठिकाण पुणे बायो एनर्जी प्रकल्प ऐवजी फुरसुंगी सब स्टेशन येथे बदलल्याने त्यामुळे पुणे बायो एनर्जी प्रकल्प ते फुरसुंगी सब स्टेशन पर्यंत वीज वहन होत असताना त्यामधील ट्रान्समिशन लॉस चा खर्च तसेच वीज वहन देखभाल दुरुस्ती खर्च हा महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक मंडळ ऐवजी मे. पुणे बायो एनर्जी सिस्टिम्स प्रा.लि. यांना करावा लागणार असल्याने व मा. मुख्य अभियंता, विद्युत विभाग यांचे अभिप्रायानुसार प्रकल्प उभारणी पुर्ण होऊन प्रत्यक्षात होणाऱ्या खर्चाची तांत्रिक सल्लागार समिती यांचेकडून पडताळणी होऊन त्यांचे अभिप्रायानुसार सदर प्रस्तावास मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता घेणेसाठी विषयपत्र सादर करणेस.

विषय क्र.१२६त्वर्य

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसुची (ड) प्रकरण ५ मधील कलम २(२) मधील तरतुदीच्या अनुषंगाने पुणे महानगरपालिकेच्या अखत्यारीत असलेल्या वानवडी येथील ई लर्निंग स्कूल येथे बांधण्यात आलेल्या इमारतीमध्ये लिफ्ट बसविणे ८ पॅसेंजर (जी+४ स्टॉप) पुरविणे बसविणे व चालू करून देणे साठी हे काम मे. ओटिस इलेव्हेटर इंडिया लि. यांचेकडून र.रु. १३,००,०००/- अधिक १८% जी.एस.टी. र.रु. २,३४,०००/- असे एकुण र.रु. १५,३४,०००/- पर्यंत करून घेणेस व करारनामा करणेस तसेच मा. महा.आयुक्त यांचे विषयपत्रातील कोष्टक क्र.१ नुसार बिल अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१२३, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

विषय क्र.१२७त्वर्य

पब्लिक प्रायव्हेट पार्टनरशिप धर्तीवर डेव्हलपमेंट क्रेडीट नोट या मोबदल्याच्या स्वरूपात शहरातील डी.पी. रस्ते व पूल खासगी सहभागातून विकसित करणे अंतर्गत बालेवाडी येथील मुळा नदीवरील कस्पटेवस्ती जोडणारा पूल पर्यंत स.नं.५१,५०,४९,४८,४७,व ४५ येथील २४ मी. रुंदीचा डीपी रस्ता विकसित करणे कामी टेंडर्स मागविली असता आलेल्या ४ टेंडर्स पैकी ठेकेदार मे.NIKHIL CONSTRUCTION GROUP PRIVATE LIMITED, यांचे टेंडर सर्वात कमी रक्कमेचे (टेंडर र.रु.२८७०८१५७२/- पेक्षा १.०३% ने जास्त) असल्याने त्यांचेकडून र.रु.२९००३८५१२=१९ अधिक जी.एस.टी. र.रु.५२२०६९३२/- पर्यंत अधिक रॉयल्टीचार्जेस र.रु.५५१४५३६/- पर्यंत अधिक मटेरिअल टेस्टिंग चार्जेस र.रु.२०११४०/- पर्यंत अधिक सल्लागार शुल्क र.रु.४७९४२६२/- अशी एकूण र.रु.३५२७५५३८२=१९ पर्यंत अधिक विशेष भाववाढ व सर्वसाधारण भाववाढ सूत्रानुसार फरक अदा करणेस/ कपात करणेस व त्यांचेशी करारनामा करून, काम करून घेणेस मान्यता मिळणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/पथ/१२४, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

विषय क्र.१२८त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागाकडे भाडे तत्वावर गुरेवाहक वाहने पुरविणेसाठी र.रु.२१८ लक्ष खालीलप्रमाणे वर्गीकरणाद्वारे उपलब्ध करून मिळणेसाठी मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/कोंडवाडा/१२५, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

| अर्थशीर्षक | कमी | अधिक |
|---|---|---|
| सन २०२५-२६ अंदाजपत्रकीय तरतूद,<br>पान क्र.८१, भाजी मंडई नवीन बांधकाम व देखभाल दुरुस्तीची कामे करणे<br>बजेट कोड- RE29A110 र.रु.५०० लक्ष | २१८ लक्ष | --- |
| नवीन सुचविलेले काम:- | | |
| पुणे महानगरपालिकेच्या कोंडवाडा विभागाकडे भाडे तत्वावर गुरेवाहक वाहने पुरविणे. | --- | २१८ लक्ष |

विषय क्र.१२९त्वर्य

पुणे महानगरपालिकेच्या सर्व दवाखाने, रुग्णालये व प्रसूतिगृहासाठी बल्क पद्धतीने औषधे खरेदी करणेस व खाली नमूद केलेला अर्थशीर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करणेस तसेच सदर निविदा ही २४ महिन्याकरिता असल्याने पुढील अर्थसंकल्पात उपलब्ध होणाऱ्या रकमेतून मागणी नुसार खात्यास वेळोवेळी आवश्यकतेनुसार औषधे खरेदी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा. अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१२६, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

अर्थशीर्षक सन २०२५-२६

RE17F133A औषधे खरेदी

(बल्क पध्दतीने मनपा सभासदांसाठी, मनपा सेवकांसाठी, आर्थिक दुर्बल गटांसाठी आरोग्य सहाय्य योजनेअंतर्गत (BPL) औषधे खरेदी, साथीचे रोग नियंत्रण विविध उपाय योजनांसाठी इत्यादी)

मान्य तरतूद रक्कम रूपये ४०,००,००,०००/- पैकी १८,००,००,०००/-

विषय क्र.१३०त्वर्य

एकत्रित आयुष्यमान भारत- प्रधानमंत्री जनआरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजने अंतर्गत नोंदणी झालेल्या रुग्णांच्या उपचाराप्रीत्यर्थ संबंधित रुग्णालयातील रुग्णांवर उपचार व शस्त्रक्रिया करताना

लागणारे इम्प्लान्ट, औषधे, डिस्पोजेबल व इतर आवश्यक साधनसामुग्री बी-२ पद्धतीने खरेदी करणे कामी निविदा मागविली असता सर्वात कमी दर देणारे निविदाधारकांकडून र.रु.५०००००/- पर्यंत त्यांची बिले अदा करणेस तसेच त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस व खाली नमूद अर्थशीर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांना बिले अदा करणेस मान्यता मिळणे बाबत मा.अति.महा.आयुक्त (वि) यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१२७, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२५-२६
RE17F322
(महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना अंतर्गत दाव्याने प्राप्त रक्कम)
मान्य तरतूद रक्कम रुपये २,००,००,०००/- पैकी ५०,००,०००/-

**विषय क्र.१३१त्वर्य**

पुणे महानगरपालिका सेवा (सेवा प्रवेश व सेवांचे वर्गीकरण) नियम २०१४ मधील आरोग्य विभागाकडील मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी, वर्ग-१ या पदाच्या सेवा प्रवेश नियमात खालीलप्रमाणे सुधारणा करून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५७ (३) (अ) नुसार मे. शासनाच्या मान्यतेसाठी पाठविण्यासाठी मा. स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेची मान्यता मिळणे बाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/साप्रवि/१२८, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

| **R.R. क्र.** | **संवर्ग** | **पदनाम** | **नेमणुकीची अर्हता व नेमणुकीचा पद्धतीची प्रचलित तरतूद** | **नेमणुकीची अर्हता व नेमणुकीच्या पद्धतीची प्रस्तावित तरतूद** |
|---|---|---|---|---|
| ३७५ | **आरोग्य सेवा श्रेणी-१** | **मुख्य पशु वैद्यकीय अधिकारी (व्हेटर्नरी सुपरिटेंडेट)** | **नामनिर्देशन**<br>अ) मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशुवैद्यकीय शास्त्रातील पदवी.<br>ब) पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी आणि अथवा संबंधित कामाचा ०३ वर्षाचा अनुभवास प्राधान्य. | **पदोन्नती - १००%**<br>**शैक्षणिक अर्हता :**<br>मान्यताप्राप्त विद्यापिठाची पशुवैद्यकीय शास्त्रातील पदव्युत्तर पदवी (MVSC).<br>**अनुभव :**<br>वरीलप्रमाणे नमूद केलेली अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता या आधारे कार्यरत पशुशल्य चिकीत्सक (वर्ग-१) पदावरील ०३ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक अथवा पशु वैद्यकीय अधिकारी (वर्ग-२) या पदाचा किमान ०६ वर्षांचा अनुभव असणे आवश्यक. |
| | | | **पदोन्नती**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता धारण करणाऱ्या पुणे महानगरपालिका आस्थापनेवरील सेवाज्येष्ठता व गुणवत्ता याआधारे कार्यरत पशु वैद्यकीय अधिकारी (व्हेटर्नरी ऑफिसर) म्हणून ०३ वर्षाचा अनुभव आवश्यक. | |
| | | | **प्रतिनियुक्ती**<br>नामनिर्देशनासाठी विहित केलेली अर्हता व अनुभव धारण करणाऱ्या शासनाकडील समकक्ष योग्य त्या अधिकाऱ्याच्या प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येईल | **प्रतिनियुक्ती**<br>पदोन्नतीने सदर पदावर अधिकारी उपलब्ध न झाल्यास वरीलप्रमाणे नमूद केलेली शैक्षणिक अर्हता व राज्य शासनाकडील समकक्ष पदावरील अनुभव धारण करणाऱ्या अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नेमणूक करता येईल. |

**विषय क्र.१३२त्वर्य**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ६७ (क) ३ मधील तरतुदीच्या अनुषंगाने पुणे मनपाच्या परिमंडळ क्र. ४ अंतर्गत येणाऱ्या हडपसर, कात्रज, कोंढवा, मुंढवा, वानवडी स्मशानभूमी चे दैनंदिन ऑपरेटिंग करणे (निविदा क्र. १८/२०२३) या निविदेची मुदत पूर्ण झाले नंतर अखंडित चालू ठेवलेल्या कामाचे दि.०१/०७/२०२४ ते दि.२९/०८/२०२४ या कालावधीतील र.रु१५,७०,५२३=७६ बिल मे.न्यू सोलर इलेक्ट्रिकल्स अँड इलेक्ट्रॉनिक्स यांना अदा करणेसाठी मा. प्रशासक/तथा मा.महा.आयुक्त यांची पश्चात प्रशासकीय मान्यता घेण्यात आली असून सदर बाब मा.स्थायी समिती मार्फत मा. मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/विद्युत/१३२, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१३३त्वर्य**

आरोग्य खात्याकडील कमला नेहरू रूग्णालय व डॉ. नायडू रूग्णालयकडील रुग्णांना अनुक्रमे अंदाजे लागणारे २५,५५० लिटर्स व ३,६५० लिटरर्स दुध दि.१/४/२०२५ ते ३१/३/२०२६ या मुदतीसाठी पुणे जिल्हा सहकारी दुध

उत्पादक संघ (कात्रज), पुणे यांचेकडून शासनाकडे उपलब्ध असलेल्या साठयानुसार प्रतिलिटर ठिकाण पोहोच दर टोण्ड दुध रू.५०.९०/- या दराने होणारी रक्कम रू.१४,८६, २८०/- पर्यंत व अगर रूग्णालयातील रूग्णांच्या संख्येत प्रासंगिक वाढ झाल्यास, शासनाने वेळोवेळी दर बदलले असल्यास त्याप्रमाणे जादा दूध लागल्यास शासकीय दूध योजनेकडे उपलब्ध असलेल्या साठ्यानुसार वेळोवेळी कमी/जास्त प्रतिलिटर ठिकाण पोहच दर त्याप्रमाणे होणा-या रकमेपर्यंत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम अनुसूची "ड" प्रकरण ५, २.(२) नुसार दुध पुरविण्यासाठी पुणे जिल्हा सहकारी दुध उत्पादक संघ (कात्रज), पुणे यांचेकडून करारनामा न करता दूध खरेदी करणेस मान्यता मिळणेबाबत मा. महा.आयुक्त यांचे जा.क्र.मआ/आरोग्य/१३४, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१३४त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.२१०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.२१०.०० कोटी ३०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/१३५, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

**विषय क्र.१३५त्वर्य**

पुणे महानगरपालिकेकडील नजीकच्या जमाखर्चाचा विचार करता र.रु.४९०.०० कोटी १२ महिने, ३६५/३६६ दिवस, ६ महिने/१८१ दिवस किंवा त्यापेक्षा कमी/जास्त कालावधीसाठी गुंतवणूक करणेस उपलब्ध होत असल्याने रक्कम रु.४९०.०० कोटी ७०% प्रमाणे मे. महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. संकीर्ण- २०२४/प्र.क्र.१४/नवि-०४, दि.१४/०२/२०२४, दि.१९/०७/२०२४ नुसार राष्ट्रीयकृत बँकांसोबत ज्या खासगी बँका र.रु.१६००० कोटी पेक्षा जास्त नक्त मूल्य असणाऱ्या व मे. महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय २०२२/प्र.क्र.१२३/२२/कोषा-प्रशा-५ दि.२२/११/२०२३ च्या शासन निर्णयामधील अटींची पूर्तता करणाऱ्या खासगी बँकांमध्ये किंवा महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९२ नुसार सार्वजनिक कर्जरोख्यात किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया, यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये गुंतवणूक करणेस, गुंतवणुकीचे सर्व अधिकार मा. महापालिका आयुक्त यांना देणेस व आवश्यकता भासलेस सदरची गुंतवणूक मुदतपूर्व मोकळी करण्यास मान्यता मिळणेबाबत मा.अति.महा.आयुक्त (ज) यांचे जा.क्र.मआ/मुले/१३७, दि.२०/०५/२०२५ चे पत्र.

**नगरसचिव**
**पुणे महानगरपालिका**